स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत जनसंवाद व वृत्तपत्रविद्या
विषयात पीएच्. डी. पदवीसाठी सादर करावयाच्या नियोजित
प्रबंधाचा

आराखडा

संशोधन विषय

आरोग्य जनसंपर्कात नवमाध्यमांची भूमिका

संशोधक

दत्तात्रय अंबेकर

मार्गदर्शक

प्रो. ड़ॉ. दीपक शिंदे

माध्यमशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ

मराठवाड़ा विद्यापीठ,नान्देड़

आरोग्य जनसंपर्कात नवमाध्यमांची भूमिका

प्रस्तावना

आरोग्य जनसंपर्क ही एक महत्त्वपूर्ण ज्ञानशाखा असून, प्रगत संवाद माध्यमांच्याद्वारे आरोग्याचा संदेश सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेला आरोग्य जनसंपर्क असे म्हणतात. वैद्यकीय दवाखाने तसेच त्याचे ग्राहक असलेले रुग्ण, डॉक्टर आणि रुग्ण, डॉक्टर आणि तेथील सहकारी या सर्वांमधील परस्पर संपर्काचा समावेश जनसंपर्कामध्ये होतो. आरोग्य जनसंपर्कात केवळ एखादा दवाखाना आणि त्याचे ग्राहक रुग्ण एवढ्यापुरताच संपर्क नसून, डॉक्टर आणि डॉक्टर, डॉक्टर आणि रुग्ण तसेच दवाखाने व डॉक्टर यांच्यातील संपर्काचा सुद्धा त्यात समावेश होतो. अलीकडे एमटीएस (मेडीकल ट्रान्सक्रिप्शन सिस्टम) या प्रणालीनुसार डॉक्टरांकडे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची माहिती संगणकावर ठेवली जाते. त्यामुळे नवमाध्यमांचा आरोग्य जनसंपर्कातील महत्त्वाचा वाटा असून, सर्वांसाठी आरोग्य ही कल्पना विकसित करण्यात आरोग्य जनसंपर्काला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

जागतिकीकरणानंतर आरोग्य क्षेत्रात प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा समावेश झाल्यामुळे शिघ्र व उत्तम सेवा देण्याकडे कल वाढत आहे. अशा वेळी एखादा डॉक्टर अन्य डॉक्टरकडून सल्ला सेवा घेऊन आपले ज्ञान प्रगत व अद्ययावत करतो. हे सुद्धा नवमाहिती तंत्रज्ञानामुळे

शक्य झाले आहे. परिणामी आरोग्य जनसंपर्क क्षेत्रात झालेल्या बदलांचा अभ्यास करणे हा या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे.

अभ्यासाचे महत्त्व

१. प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे आरोग्य सुविधांचे आधुनिकीकरण झाले आहे व या सुविधा गतीने लोकांपर्यंत पोहचत आहेत. त्यातील अडसर कोणते आहेत हे समजून घेतले पाहिजे.

२. नवमाहिती तंत्रज्ञान सामान्य माणसापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यासाठी उपयोगी पडत आहे. संकेत स्थळांप्रमाणे सोशल मिडिया, ब्लॉट, ट्विटर, वॉटसअप इत्यादी प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे आरोग्यविषयक ज्ञान व कौशल्य सामान्य माणसापर्यंत पोहचत आहे.

३. नवा ग्राहक हा इंटरनेट वापरणारा ग्राहक आहे. त्याला या प्रगत तंत्रज्ञानामुळे सर्व प्रकारच्या ज्ञानकौशल्याची ओळख होत आहे व त्याला अपेक्षीत अशा आरोग्य सुविधा गतीने प्राप्त होत आहेत. त्यातील गती, पारदर्शकता व कार्यक्षमता वाढविण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरणार आहे.

४. हा अभ्यास डॉक्टर व ग्राहक रुग्ण या दोहोंनाही आरोग्य संवादाची नवी क्षितीजे समाजवून देणारा आहे. त्यामुळे गरजू रुग्णांपर्यंत आरोग्य पोहाचविता येऊ शकते.

५. वृत्तपत्रे, नभोवाणी व चित्रवाणीपेक्षाही नवमाध्यमे आरोग्याचे संदेश तत्परतेने पाहोचविण्यास तसेच विविध साथीचे रोग व समस्या या बाबतीत मार्ग काढण्यासाठी पोषक ठरू शकतील. त्यामुळे हा अभ्यास दूरदृष्टीने आखला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे

कुठल्याही सामाजिक संशोधनासाठी सुस्पष्ट उद्दिष्टे आवश्यक असतात. या शोध कार्यासाठी पुढील उद्दिष्टे समोर ठेवली आहे.

१. आरोग्य जनसंपर्कात नवमाध्यमांचे स्थान व भूमिका स्पष्ट करणे.

२. नवमाहिती तंत्रज्ञानातील विविध साधनांपैकी उपयुक्त साधनांची चिकित्सा करणे व उपयुक्तता सिद्ध करणे.

३. नवमाध्यम तंत्रज्ञानातील आरोग्य जनसंपर्काच्या क्षमता लक्षात घेणे.

४. आरोग्य जनसंपर्कात नवीन कल्पनांचे अध्ययन करून त्यावर प्रकाश टाकणे.

५. आरोग्य जनसंपर्कात नवमाध्यमांच्या आधारे नवे प्रतिमान विकसित करणे.

अभ्यासाची गृहीतके

कुठल्याही सामाजिक संशोधनासाठी सुस्पष्ट अशी गृहीतके आवश्यक असतात. या शोध कार्यासाठी पुढील गृहीतके समोर ठेवली आहे.

१. प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारलेला जनसंपर्क हा आरोग्याच्या प्रसारात महत्त्वाची

भूमिका पार पाडत आहे.

२. आरोग्य संवादात प्रगत तंत्रज्ञानामुळे नव्या क्षमतांचे संवर्धन होत आहे.

३. नवमाध्यमे डॉक्टर, रुग्ण व समाज या सर्वांना समीप आणत आहेत.

४. नवमाध्यम तंत्रज्ञान समाज जीवनाला नवी गती देत आहे.

५. २१व्या शतकात सर्वांसाठी आरोग्य साध्य करण्यासाठी नवमाध्यमे वरदान ठरत आहेत.

संशोधन पद्धती

हा संशोधनाचा विषय नवा असल्यामुळे असे अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे अनुरूप ठरते. जेव्हा संशोधन समस्या ही कारण व परिणामावर आधारलेली असते आणि जेव्हा ती तुलनेने इतर विषयापेक्षा नवी असते, तेव्हा हा आराखडा वापरला जातो. ह्या अभ्यासाचा विषय क्रीडा समाजशास्त्र या या ज्ञानशाखेत मोडतो आणि त्याचा अभ्यास प्रथमच या संशोधन प्रकल्पात होत आहे. त्यामुळे हे अध्ययन करताना अन्वेषणात्मक आराखडा वापरणे अधिक समर्पक ठरते.

प्रा. घाटोळे यांच्यामते, अन्वेषणात्मक संशोधनाचा उद्देश एखाद्या सामाजिक घटनेच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेणे हा असतो. शोधकर्ता, त्या विशिष्ट घटनेचे स्वरूप, तिचे परिणाम, त्या घटनेची वस्तुस्थिती, तिच्या मुळाशी असणारी कारणे वस्तुनिष्ठ दृष्टीने शोधून काढण्याचा प्रयत्न करतो. हा शोध समस्येची अथवा घटनेची

निवड केल्यानंतर गृहितकृत्य निर्माण करण्यास फार उपयोगी ठरते.

१) संबंधित साहित्याचे अध्ययन किंवा साहित्य सर्वेक्षण

ही पहिली आवश्यक अट आहे. कारण त्याशिवाय त्या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैध्दांतिक आधाराशिवाय शोध कार्ये करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय. असे होऊ नये म्हणून या अभ्यासामध्ये पूर्व अध्ययनाचा कालबध्द व क्रमबध्द आढावा घेण्याचे योजिले आहे.

या पैलूचे महत्त्व सांगताना प्रा. नाडगोंडे म्हणतात, जो अभ्यासविषय संशोधनासाठी जवळजवळ निश्चित केलेला असतो, त्या अभ्यासविषयासंबंधी उपलब्ध असणारे साहित्य वाचणे व त्यावर मनन करणे हे महत्त्वाचे असते. त्यामुळे अभ्यासकांच्या समस्येसंबंधीच्या विचाराला योग्य वळण मिळत असते. त्याविषयीची माहिती अभ्यासकाला मिळते. यावरून प्रकाशित साहित्याचे महत्त्व कळते. अशा प्रकारच्या आकलनातून एक दृष्टी लाभू शकते. या अभ्यासात आरोग्य जनसपंर्क व नवमाहिती तंत्रज्ञान याविषयी ३० ग्रंथांचा व दहा संशोधन पत्रिकातील लेखांचा आढावा घेण्यात येईल. तसेच काही संकेत स्थळांचेही अध्ययन करण्यात येईल.

२) अनुभव सर्वेक्षण

ही दुसरी महत्त्वाची गरज, संशोधक जे विषयक्षेत्र निवडतो, त्याबाबतीत इतरांना काय माहिती आहे, कोणते अनुभव आहेत हे संशोधकाने जाणून घेतले पाहिजे. अशा

अनुभवी व्यक्तींशी संपर्क ठेवला पाहिजे. अशा व्यक्तींचे अनुभव मार्गदर्शक ठरतात. अशा अनुभवी व्यक्तीपैंकी सर्वांशीच संपर्क साधणे अव्यवहार्य ठरते म्हणून त्यांच्यात निवड करण्याचे कौशल्य अभ्यासकाने दाखविले पाहिजे. त्यांच्या मुलाखती घेतल्या पाहिजे, प्रश्न विचारून आवश्यक ती तथ्ये संकलित केली पाहिजे. उत्तरदात्यांचे अनुभवांचे संकलन करताना अधिक शास्त्रीयपणे व्हावे हा त्यामागचा हेतू असतो. प्रा. नाडगोंडे म्हणतात, साहित्य सर्वेक्षणातून अभ्यासविषयाबद्दलची माहिती मिळते, पण ज्यांनी त्या समस्येचा अनुभव घेतलेला आहे. त्यांच्या अनुभूतीतूनही संशोधक बरेच काही शिकत असतो. अशा प्रकारे अनुभवजन्य ज्ञान अभ्यास विषयाला पोषक ठरते.

या संशोधनात आरोग्य सेवा वापरणाऱ्या ३०० नागरिकांचे मराठवाडा प्रदेशातून यादृच्छिक नमुना निवड तंत्राने अध्ययन करण्यात येईल. त्याची ३० प्रश्नांनी युक्त अशी प्रश्नावली तयार करण्यात येईल.

३) अंतर्दृष्टीस प्रेरणा देणाऱ्या घटकांचे विश्लेषण

या संदर्भात प्रेरक घटकांची मीमांसा करताना प्रा. घाटोळे म्हणतात, आंतरदृष्टीस प्रेरणा देणाऱ्या घटकांचे विश्लेषण हे तिसरे महत्त्वाचे तत्त्व होय. कधी कधी अभ्यास विषयाशी संबंधित असे अन्य विषय असतात की, ज्यामुळे अभ्यासकाची व्यावहारिक आंतरदृष्टी विकसित होऊ शकते. ही आंतरदृष्टी गृहीतकृत्य निर्माण करण्यास व वास्तविक संशोधन करण्यास सहायक होते. कारण प्रत्येक समुदायाच्या जीवनात अशा अनेक घटना घडत असतात की, ज्यामुळे अभ्यासकाचे लक्ष आकर्षिले जाते. काही घटना अतिशय सरळ व

स्पष्ट असतात. काही व्यक्तींच्या ठिकाणी विशेष गुण असतात, या सर्वांच्या निरीक्षणामुळे अभ्यासकाची आंतरदृष्टी विकसित होते, प्रोत्साहित होते. नवीन कल्पना सुचतात.

यामध्ये आरोग्य क्षेत्रात पूर्ण वेळ काम करणाऱ्या ३० कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेण्यात येतील.

प्रकरण योजना

या पार्श्वभूमीवर या प्रबंधात पुढील प्रमाणे प्रकरणांची योजना करण्यात आली आहे.

प्रकरण १ : संकल्पना

या प्रकरणात आरोग्य जनसंपर्क, नवमाध्यमे इत्यादी संकल्पनांचा शास्त्रीय अभ्यास करण्यात येईल. संशोधनाचे स्वरूप, व्याप्ती व महत्त्व तसेच उद्दिष्टे इत्यादी पैलूंवर प्रकाश टाकण्यात येईल. पुढील शोधाची दिशा स्पष्ट करून आरोग्य संवाद समाजशास्त्र दृष्टीकोन या प्रकरणात सपष्ट करण्यात येईल.

प्रकरण २ : संशोधन पद्धती

या प्रकरणात अन्वेषणात्मक आराखडा वापरण्यात येईल. त्यात साहित्य समालोचन, अनुभव सर्वेक्षण आणि आंतरदृष्टीस चालना देणारे घटक हे तीन पैलू अभ्यासण्यात येतील. तथ्य संकलनाची साधने स्पष्ट करण्यात येतील. या संशोधनात आरोग्य सेवा वापरणाऱ्या ३०० नागरिकांचे मराठवाडा प्रदेशातून यादृच्छिक नमुना निवड तंत्राने

अध्ययन करण्यात येईल. तसेच अभ्यासची गृहीतके मांडण्यात येतील तसेच तथ्य संकलनाचे स्त्रोत स्पष्ट करून प्राथमिक व दुय्यम साधनांवर प्रकाश टाकण्यात येईल. अहवाल लेखन पद्धतीवरही प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण ३ : प्रकाशित साहित्याचे समालोचन

या प्रकरणामध्ये उपलब्ध प्रकाशित साहित्याचे शास्त्रिय विश्लेषण करण्यात येईल. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच प्रादेशिक व स्थानिक ग्रंथांचे वर्गिकरण करून त्यावर प्रकाश टाकण्यात येईल. तसेच पूर्व संशोधनाच्या मर्यादा स्पष्ट करून भावी दिशा स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण ४ : क्षेत्रीय पाहणीचा अहवाल

संकलित माहितीचे तालिका व आलेखाच्या आधारे विश्लेषण करण्यात येईल तसेच अनुमाने काढण्यात येतील. तथ्यांची संगतवार मांडणी करून भाष्य केले जाईल. हे प्रकरण उपलब्ध सांख्यिकीय तथ्यांचे शास्त्रीय विवेचन करणारे असेल. असे विवेचन करताना तर्कशुद्ध मांडणी करून त्या आधारे नवी मीमांसा केली जाईल व भावी प्रमेयास आधार देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

प्रकरण ५ : निष्कर्ष, सूचना, शिफारशी

या प्रकरणात प्रथम मागील सर्व प्रकरणांचा सारांश देऊन ठळक निष्कर्ष मांडण्यात

येतील. नवे प्रमेय मांडून सैद्धांतिक मांडणी करून संशोधनाचे नवे विषय सुचित केले जातील शेवटी उपसंहार करून अभ्यास विषयावर अंतिम प्रकाश टाकण्यात येईल.

संदर्भ ग्रंथसूची

1. Maharashtra -2013, Dastane Co. Pune
2. India, -2013, Publication Division, Govt. of India, New Delhi
3. Gurnig J. E. (Ed.), Excellence in public Relations and Communication Management, Hillsdale, Lawrence Erlbaum, 1992
4. Stuart Elliot, Public Relations Defined, After an Energetic Public Discussion, New York Times, 2012
5. Narula Uma Mass Communication Technology : Theory New Perspectives Har-Anand Publications New Delhi
6. Mehata D. S., P..R. In India, Allied Publication, New Delhi, 1985, p.21
7 Black Sam, Scientific Public Relations, Page No.21
8. Scott Cutlip and Centre, Effective Public Relations
9. Kumar Keval J., Mass Communication in India, Jayco Publication Mumbai,1982
10. Lesly Philip (ed.), Lesley's Public Relations Handbook, Bombay Supuer Book House

११. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधनपद्धती, विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, २०००

१२. प्रा. घाटोळे रा.ना.; समाजशास्त्रीय संशोधन तत्त्व आणि पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००८-०९

१३. पंत एम. सी., जनसंपर्क एवं विज्ञापन सिद्धांत और व्यवहार, खंड-१ जनसंपर्क, वैराईटी बुक्स पब्लिशर्स अॅण्ड डिस्ट्रीब्युर्ट,नई दिल्ली, २०११

१४ नाडगोंडे गुरुनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९९

१५. डॉ. धारूरकर वि. ल., जनसंपर्क मीमांसा, उपरोक्त, पृ. क्र. १६७

१६. रेड्डी नृसिंह, विदुरा, पीआर विशेषांक, नवी दिल्ली, १९८५,

१७. विदुरा, जनसंपर्क विशेषांक, १९९१

१८. पुरी सुरेश, जनसंपर्क संकल्पना व सिद्धांत, विमुक्तजन प्रकाशन, औरंगाबाद, १९८५

१९ भोसले डी. एम., शैक्षणिक जनसंपर्क, स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, २०११

२०. जाधव सौदागर, जनसंपर्क आणि स्थानिक स्वराज्य संस्था, अखिल भारतीय स्वराज्य संस्था, मुंबई. २०००

संशोधक
दत्तात्रय अंबेकर

मार्गदर्शक
प्रो. ड़ॉ. दीपक शिंदे
माध्यमशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाड़ा
विद्यापीठ,नान्देड़